महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती

जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, श्रीकृष्णपेठ, अमरावती, महाराष्ट्र - ४४४ ६०१

वेबसाईट : gmcamravati.org फोन नं.०७२१-२९९३१७१

जा.क्र.शावैमअ/वि.वे./थेट मुलाखत/व.नि./ता.नि./3801 /२५ दिनांक :०८/०८/२०२५

## जाहिरात

विषय : वरिष्ठ निवासी (सेवा) संवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने 120 दिवसांकरीता भरणे करीता थेट मुलाखत आयोजित करण्याबाबत...

संदर्भ : १. शासन निर्णय क्र : - पदनि-2023/प्र.क्र.186/23 वैसेवा-2 दिनांक : 06 मार्च, 2024.
२. स्था.नि.मं. यांची मान्य टिप्पनी दिनांक : ०६/०८/२०२५.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती या संस्थेतील विविध विषयातील वरिष्ठ निवासी (सेवा) या संवर्गातील राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार आवश्यक तसेच मंजुर पदांवर बंधपत्रित उमेदवारांमधुन तसेच मा.संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडुन बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत संस्थास्तरावर स्थानिक निवड मंडळा मार्फत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने १२० दिवसांकरीता भरण्याकरीता जहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. विभागनिहाय सुधारीत रिक्त पदांचा तक्ता, शैक्षणिक अर्हता, अटी व शर्थी व अर्जाचा नमुणा, कागदपत्र पडताळणी / मुलाखतीचा वार व वेळ याबाबतची संपुर्ण माहिती मा.वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे संकेतस्थळ www.med-edu.in व या संस्थेचे संकेतस्थळ www.gmcamravati.org वर उपलब्ध आहे.

तरी पात्र उमेदवारांनी वरिष्ठ निवासी (सेवा) पदाकरीताचा अर्ज परिपुर्ण भरुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट स्वसाक्षांकीत छायाप्रतीसह जाहिरातीमध्ये नमुद वार व वेळेत कागदपत्र पडताळणी/मुलाखतीस आवश्यक सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रतींसह न चुकता उपस्थित राहावे.

**सहपत्र : वरिलप्रमाणे.**

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती.

**(पुढील पानावर)**

## वरिष्ठ निवासी (सेवा) संवर्गातील रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | विषय | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | शरिरचनाशास्त्र | ०३ | राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांचे नियमानुसार |
| २ | शरिरक्रियाशास्त्र | ०३ | |
| ३ | जीवरसायनशास्त्र | ०३ | |
| ४ | औषधशास्त्र | ०३ | |
| ५ | सुक्ष्मजिवशास्त्र | ०३ | |
| ६ | न्यायवैद्यकशास्त्र | ०२ | |
| ७ | रोग प्रतिबंधक व सामाजिक औषध वैद्यकशास्त्र | ०३ | |
| ८ | औषधवैद्यकशास्त्र | ०१ | |
| ९ | बालरोगचिकीत्सा | ०१ | |
| १० | त्वचा व गुप्तरोग | ०१ | |
| ११ | मनोविकृती | ०१ | |
| १२ | शल्यचिकीत्साशास्त्र | ०२ | |
| १३ | कान, नाक व घसा शास्त्र | ०१ | |
| १४ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | ०१ | |
| १५ | बधिरिकरणशास्त्र | ०१ | |
| १६ | इमर्जन्सी मेडीसीन | ०६ | |
| | **एकुण -** | **३५** | |
| **टिप** : वरिलप्रमाणे रिक्त पदांच्या संख्येत कमी अथवा जास्त असा बदल होऊ शकतो.** | | | |

**अ) शैक्षणिक व इतर अर्हता कागदपत्र : राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग यांचे नियमानुसार.**

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १ | PG Passing Certificate |
| २ | PG Marksheet |
| ३ | PG Attempt Certificate |
| ४ | Residency Completion Certificate (36 Months) |
| ५ | Bond Certificate (if applicable) |
| ६ | Certificate from the institute, that said Institute & Course is recognized by NMC/MCI |
| ७ | MBBS Degree from recognized University |
| ८ | MBBS Passing Certificate |
| ९ | MBBS Marksheet (All 1/2/3 Marksheet) |
| १० | MBBS Attempt Certificate |
| ११ | Internship Completion Certificate |
| १२ | Valid Permanent Registration Certificate of MMC or other state Medical Council in India/MCI |
| १३ | No Objection Certificate from concerned department (for working candidate) |
| १४ | SSC Passing Cert/Valid Passport (as proof of age) |

(पुढील पानावर)

**Preference Criteria for Selection :**

Candidate will be selected on the post of Senior Resident on the merit basis of marks obtained in Post Graduate degree examination.

1) 1st preference will be given to bonded candidate who have completed 36 months of residency & passed Post Graduate (PG) degree from any Govt. Medical College or Municipal Corporation College in Maharashtra.
2) 2nd preference will be given to candidates who have completed 36 months of residency & passed PG with higher marks from any NMC/MCI recognized Govt. / Private Medical College in Maharashtra.
3) 3rd preference will be given to candidates who have completed 36 months of residency & passed PG with higher marks from any NMC/MCI recognized Medical College other than Maharashtra.
4 The preference of selection will be first to MD/MS candidate followed by DNB

**Rule of TIE – BREAKER :**

First Level :- **Number of attempts will be considered if two or more candidates having equal marks or percentage (%) 02 marks will be deducted for every attempt from total mark obtained in PG.
If tie persists then-

Second Level :- The Candidate with higher aggregate mark in MBBS Examination.
If tie persists then-

Third Level :- The older candidate will be preferred

**ब) अर्ज सादर करणे :**

| | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याचा कालावधी :- | सर्व कार्यालयीन दिवशी, सायं.५.०० वा. पर्यंत |
| अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- | आवक जावक विभाग, शा.वै.म.अमरावती |
| कागदपत्र पडताळणी व मुलाखत वार व वेळ :- | दर बुधवार, वेळ : स. ११.०० ते दु. ०१.०० वा. पर्यंत. |
| स्थळ :- | मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांचे दालन, जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) परिसर, अमरावती. |

टिप :-

१. प्रती अर्ज शुल्क रु.२००/- पावती (नापरतावा शुल्क) रोखशाखा, शा.वै.म.अमरावती येथुन प्राप्त करावी व सदर पावती अर्जासोबत जोडण्यात यावी.

२. मुलाखतीस येतांना सर्व आवश्यक मुळ कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक राहील, अन्यथा उमेदवारांचा निवडीकरीता विचार करण्यात येणार नाही.

३. विभागनिहाय रिक्त पदानुसार/आवश्यकतेनुसार अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी कागदपत्र पडताळणी / मुलाखतीकरीता संस्थेच्या सुचना फलकावर दर मंगळवार सायं. ५.०० वा पर्यंत प्रदर्शीत करण्यात येईल, याची अर्ज केलेल्या उमेदवारांनी नोंद घेवुन मुलाखतीस उपस्थित रहावे, मुलाखतीस प्रत्यक्ष उपस्थित उमेदवारांचीच निवडीकरीता विचार करण्यात येईल, अनुपस्थित उमेदवारांचा निवडीकरीता विचार करण्यात येणार नाही.

क) वयोमर्यादा : ४५ वर्ष

ड) विद्यावेतन : मुळ वेतन रु. ७१००/- अधिक इतर वेतन व भत्ते.

**इ) जाहिरातीमध्ये बदल /दुरुस्ती /रदद करण्याचा अधिकार.**

****या जाहिरातीमधील कोणत्याही मजकुरात उदा.अटी/शर्ती/नियम/पदसंख्या कमी अथवा जास्त करणे/जाहीरात रदद करणे/अंशत: बदल करणे/नियुक्ती आदेश निर्गमित करणे, प्रलंबीत ठेवणे इत्यादींचा अधिकारी अधिष्ठाता/स्थानिक निवड मंडळ यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे किंवा प्रलंबीत ठेवणे या बाबतचे अंतिम निर्णय व अधिकार अधिष्ठाता/स्थानिक निवड मंडळ यांना असतील.**

(पुढील पानावर)

**सर्वसाधारण अटी व शर्ती :**

१. सदर निवड प्रक्रिया ही थेट मुलाखतीने करण्यात येत असुन त्याकरीता पत्र पाठविले जाणार नाही. तसेच मुलाखतीस प्रत्यक्ष उपस्थित उमेदवारांचाच रिक्त असलेल्या पदांवर निवडीकरीता विचार केला जाईल. मुलाखतीकरीता स्वखर्चाने जाहीरातीमध्ये नमुद सर्व मुळ कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक राहील.

२. अर्ज सादर करतेवेळी अर्जासोबत आपणाकडील सर्व कागदपत्रांच्या स्वसांक्षांकीत प्रती सादर करणे अनिवार्य राहील. अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर इतर कोणतेही कागदपत्र अर्जास जोडता येणार नाही.

३. वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन त्यास राज्य शासनाचा कर्मचारी म्हणता येणार नाही.

४. नियुक्त निवासी डॉक्टरांनी रुजु झाल्यानंतर रुग्णसेवेकरीता रुग्णालयाच्या आवारात/जवळपासच्या ठिकाणी नियमीत उपलब्ध असणे बंधनकारक राहील तसेच वरिष्ठांनी कामकाजासंबंधी दिलेल्या सर्व आदेशांचे पालन करणे किंवा कामकाजासंबंधी दुरध्वनीवरुन दिलेल्या सर्व सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

**५. वरिष्ठ निवासी पदावर बंधपत्रित उमेदवारांचीच निवड करण्यात येईल. बंधपत्रित/प्राधान्यक्रम उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त राहीलेल्या पदावर अबंधपत्रित उमेदवारांचा विचार करण्यात येईल. संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडुन बंधपत्रित उमेदवार उपलब्ध झाल्यास/रुजु झाल्यास संबंधीत विषयामध्ये भरण्यात आलेल्या उमेदवारांची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ प्रभावाने समाप्त करण्यात येईल.**

६. निवड झालेल्या उमेदवाराने रुजु होताच रु.२५०००/- एवढया रकमेचा धनादेश **अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अमरावती** यांचे नावे अनामत रक्कम म्हणुन रोख विभागाकडे सादर करावे लागेल व त्यासंबंधीच्या पावतीची नोंद आवासी निवासी विभागाकडे करावी व मुळ पावती उमेदवाराने आपल्याकडे ठेवावी, त्याशिवाय त्यांचे विद्यावेतन अदा केल्या जाणार नाही. अनामत रक्कम पदाचा पूर्ण कालावधी संपुष्ठात आल्यावर अथवा पद सोडण्याबाबतची एक महीना पूर्व सुचना दिल्यानंतर परत करण्यात येईल. पद सोडावयाचे असल्यास त्याबाबत एक महिना अगोदर पद सोडत असल्याची पुर्वसुचना न दिल्यास सदर अनामत रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल. अनामत रकमेची मुळ पावती सादर केल्याशिवाय अनामत रक्कम / नाहरकत प्रमाणपत्र मिळणार नाही.

७. अंतिम निवड झालेल्या/रुजू झालेल्या उमेदवारास कोणत्याही खाजगी/मंडळ/निमशासकीय संस्थेत/कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारची नोकरी स्विकारता येणार नाही किंवा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. जर असे निदर्शनास आले तर सदर उमेदवारांची सेवा तात्काळ प्रभावाने कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

८. नियुक्ती कालावधी समाप्त झाल्यानंतर सेवा पुढे सुरु ठेवण्याकरीता विभागप्रमुखांमार्फत पुर्ननियुक्ती मिळण्याबाबतचा अर्ज सादर करावा लागेल. पुर्ननियुक्ती करीता विभागप्रमुख यांची शिफारस असणे आवश्यक राहील.

९. निवड झालेल्या उमेदवाराने विभागप्रमुखांच्या निर्देशानुसार २४ तास रुग्णसेवेकरीता उपस्थित असणे बंधनकारक आहे. उमेदवार रुग्णसेवेमध्ये हलगर्जीपणा करत असल्याचे संस्थाप्रमुख अथवा विभागप्रमुख यांचे निदर्शनास आल्यास सदर उमेदवाराची सेवा तात्काळ प्रभावाने कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल. साथरोग/आरोग्य सेवेसंबंधी आणिबाणी/अत्यावश्यक रुग्णसेवा प्रसंगी आपणास पद सोडता येणार नाही.

१०. प्रशासकीय किंवा काही कारणास्तव निवड (भरती प्रक्रिया) कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्यावर थांबविण्याचा किंवा रदद करण्याचा किंवा बदल करण्याचा संपुर्ण अधिकारी अधिष्ठाता/स्थानिक निवड मंडळास राहील.

११. इतर संस्थेतील कार्यरत उमेदवारांनी अर्जासोबत संबंधीत संस्था प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१२. सदर जाहिरातीमधील नमुद पदे ही तात्पुरत्या तसेच पुर्णत: कंत्राटी स्वरुपाची असुन भविष्यात सदर पदावर नियमीत करण्याकरीता कोणताही दावा करता येणार नाही. वरिष्ठ निवासी या पदाकरीता शासकीय निवासस्थान उपलब्ध नाही.

(पुढील पानावर)

**प्रत,**

१. सुचना फलक – महाविद्यालय, रुग्णालय, शा.वै.म., अमरावती.
२. सुचना फलक – ग्रंथालय, व्याख्यान कक्ष, शा.वै.म., अमरावती.
३. संस्थेचे संकेतस्थळ – gmcamravati.org वर प्रसिध्दीकरीता

**प्रत माहितीस सविनय सादर,**

१. मा.आयुक्त (वै.शि.) वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई – ०१.
२. मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई – ०१.

**अधिष्ठाता**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती.**

| कार्यालयीन कामकाजाकरीता | | | |
|---|---|---|---|
| अर्ज क्रमांक :- | | अर्ज दिनांक :- | |

## वरिष्ठ निवासी (सेवा) पदाकरीता अर्जाचा नमुना

प्रति,
मा. अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अमरावती.

फोटो

| अर्जातील पदाचे नाव - | | विभागाचे नाव- |
|---|---|---|
| उमेदवाराचे संपुर्ण नाव - | | |
| संपूर्ण पत्ता - | | |
| मोबाईल क्र. | पॅन क्र. | आधार क्र. |
| ई-मेल- | | |
| जात प्रवर्ग :- | | |

| जन्म दिनांक | दिनांक | महिना | वर्ष | मुलाखतीच्या दिवशीचे वय | वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| शैक्षणीक अर्हता | उत्तीर्ण केलेली परीक्षा (tick which applicable) | प्राप्त गुण | पैकी गुण | टक्केवारी | No of Attempt | Name of Institute |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | MBBS | | | | | |
| २ | MD/MS/DNB | | | | | |
| ३ | Diploma | | | | | |
| ४ | Other Additional Qualification : Fellowship / any other | १.<br>२.<br>३. | | | | |

| | | |
|---|---|---|
| MS-CIT उत्तिर्ण आहात का? | होय | नाही |
| अर्जदार इतर संस्थेत कार्यरत असल्यास, संबंधीत विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय | नाही |
| उमेदवार बंधपत्रित आहे का? | होय | नाही |
| असल्यास, बंधपत्र प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय | नाही |

### हमिपत्र

मी याव्दारे हमी देत आहे की, अर्जात नमुद केलेली वरीलप्रमाणे सर्व माहिती माझ्या माहितीप्रमाणे पुर्णत: खरी आहे. अर्जातील माहिती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यायर पुर्वसुचना न देता रदद करण्यात येईल आणि माझ्या विरुध्द कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक : / /

अर्जदाराची स्वाक्षरी